**अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेचे, राजर्षी शाहू अकॅडमी, पुणे – ४११००९**

## राज्यसेवा मुख्य परीक्षा २०१९ साठी मुलाखतीस पात्र ठरणाऱ्या उमेदवारांनी अभिरुप मुलाखतीस नोंदणी करणेबाबत जाहीर निवेदन

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून घेण्यात आलेल्या राज्यसेवा मुख्य परीक्षा २०१९ जाहिरात क्रमांक ७/२०१९ चा निकाल दि. १४.१.२०२० रोजी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध झालेला आहे. या परीक्षेच्या निकालातून मुलाखतीस पात्र ठरणाऱ्या उमेदवारांच्या अभिरुप मुलाखती राजर्षी शाहू अकॅडमी शाहू कॉलेज कॅम्पस, पर्वती, पुणे येथे माजी अध्यक्ष, सदस्य, एम.पी.एस.सी. माजी/आजी सनदी अधिकारी, माजी कुलगुरु, उच्च शिक्षण क्षेत्रातील प्राचार्य, प्राध्यापक या तज्ज्ञ पॅनलकडून विनामूल्य घेतल्या जाणार आहेत.

तरी मुलाखतीस पात्र ठरणाऱ्या उमेदवाराने राजर्षी शाहू अकॅडमीच्या www.rajrshishahu.academy या संकेतस्थळावर विहित नमून्यात माहिती भरुन नोंदणी करावी. सन २०१८–१९ या वर्षी अकॅडमीकडून अभिरुप मुलाखती घेण्यात आलेल्या आहेत.

यावर्षी जानेवारी २०२० पासून अभिरुप मुलाखती घेण्यात येणार आहेत. या सुवर्ण संधीचा आवश्य लाभ घ्यावा व संकेतस्थळावर (MPSC Rajyaseva Mock Interview 2020 Main Exam Click here) नोंदणी करावी. या अकॅडमीस खालील मान्यवर मार्गदर्शन करणार आहेत:–

- मा. श्री. मधुकर कोकाटे (भाप्रसे) माजी अध्यक्ष महाराष्ट्र लोकसेवा आयोग
- मा. श्री. प्रभाकर देशमुख (भाप्रसे) सेवानिवृत्त विभागीय आयुक्त कोकण विभाग
- मा. श्री. उमाकांत दांगट (भाप्रसे) सेवानिवृत्त विभागीय आयुक्त औरंगाबाद विभाग
- मा. डॉ. नवनाथ पासलकर माजी सदस्य महाराष्ट्र लोकसेवा आयोग व माजी संचालक तंत्र शिक्षण महाराष्ट्र राज्य

पुणे

दि. १७/१२/२०१९ आपली विश्वासू

**(सौ. प्रमिला गायकवाड)**
**सरचिटणीस**